स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक 12–11–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 11. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 12. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 13. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 14. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |
| 15. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. श्याम वर्धने, आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 168</u> :— महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत APL महिलांना प्रती वार्ड २० महिलांची निवड करुन नागपूर महानगरपालिके अंतर्गत असलेले १४५ वार्ड व ५ मनोनीत सदस्य असे एकूण १५०X२०=३००० महिलांना व्यावसायीक प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्यात प्रती प्रशिक्षणार्थी रु. २०००/— प्रमाणे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस शासनाने ठरवून दिल्यानुसार शुल्कापोटी द्यावयाचे आहे. त्यापैकी लाभार्थ्यांचा हिस्सा १०% (रु.२००) असून उर्वरीत ९०% (रु. १८००/—) महानगरपालिकेला द्यावयाचे आहे. या प्रशिक्षणाकरीता १८००X ३०००=५४.०० लक्ष अंदाजीत खर्च अपेक्षित आहे. याकरीता दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देवून प्रशिक्षण संस्थेकडून स्पर्धात्मक दर मागविण्यात येईल. हा खर्च पद क्र. २७४ महिला बाल कल्याण समिती मधून करण्यात येईल. तरी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देवून स्पर्धात्मक दर मागविण्यासाठी, तसेच यावर होणारा अंदाजीत खर्च रु.५४.०० लक्षाच्या खर्चाकरीता मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, "ऑल इंडीया लोकल सेल्फ गर्व्हमेंट" या संस्थेचे मागिल वर्षातील काम बघता व आयुक्त, म.न.पा. यांनी केलेल्या सुचने प्रमाणे, यादीत समाविष्ट असलेल्या प्रशिक्षणा शिवाय नविन व्यवसायभिमुख कोर्सेस अंतभूत करुन ऑल इंडीया लोकलसेल्फ गर्व्हमेंट" या संस्थेस उपरोक्त काम देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 169</u> :— प्रभाग क्र.2—अ, तारकेश्वर नगर जवळील पिवळया नदीवर रेजड् कॉजवे पाईप कल्व्हेट बांधकामास्तव एकूण रु. 47,78,049/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 678 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे,तसेच या कामास्तव श्री. उदयदत्त गजभिये, एन वास्तु यांना सल्लागार म्हणून नियुक्त करुन त्यांना रु.1,68,272/— एवढे सेवाशुल्क मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 170</u> :— शासन निर्णय क्र.नामपा—2308—680—प्र.क्र. 358—नवि—26, दिनांक 01.04.2009 व शासन निर्णय क्रमांक नामपा—2308—680—प्र.क्र. 358—नवि—26, दिनांक 08.09.2010, अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या क्रमशः नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसुली उपविधि 2009 व दुरुस्ती उपविधी 2010 च्या कलम 56(ब) अन्वये प्राप्त अधिकरांतर्गत आयुक्त, म.न.पा. यांनी सोबत सहपत्र— 1 वर जोडलेल्या आदेश क्रमांक एम.सी./206,दि.31.03.2012 अन्वये मंजुर केलेले व दिनांक 01.04.2012 पासून लागू केलेल्या सुधारित दराची नोंद घेण्याचा संदर्भात स्थायी समितीने ठराव क्र. 120,दिनांक 27.08.2012 अन्वये मागविलेला अहवाल सहपत्र 'अ' वर जोडलेला आहे. सबब दि. 01.04.12 पासून लागू केलेल्या पाणीपट्टीच्या सुधारित दरांची नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन संपूर्ण सविस्तर अहवालासह, म.न.पा. सभागृहाकडे नोंदी साठी पाठविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

## स्थायी समिती ठराव क्र. 170 चे सहपत्र – 1

नागपूर महानगरपालिकेत सर्वप्रथम सन 20 एप्रिल 1966 ला राज्यशासनाने मान्य केलेले नागपूर शहर पाणीपट्टी, दरमुल्यांकन वसुली उपविधी अंमलात आले. या उपविधित वेळोवेळी पाणीपट्टीचे वर्गवारी व दरातच सुधारणा करण्यात येत होत्या. सन 2009 अगोदर या उपविधीतील शेवटची सुधारणा 30 ऑगस्ट 2000 मध्ये करण्यात आली होती व या सुधारणेप्रमाणे मंजुर पाणीपट्टीचे दर 31 मार्च 2009 पर्यंत अंमलात होते. सन 1966 मध्ये मंजूर झालेल्या उपविधीतील बऱ्याचश्या कलमात सद्य परिस्थितीत बदल करणे अपरिहार्य झालेले होते. सबब आत्ताच्या पाणीपुरवठा व्यवस्थापनातील आवश्यकतेप्रमाणे 1966 च्या उपविधीतील बहुतांश कलमात सुधारणा करुन नवीन उपविधीस म.न.पा. महासभा व राज्य शासनाच्या मान्यतेनंतर नागपूर शहर म.न.पा. पाणीपट्टी दर, मुल्यांकन आणि वसुली (मुख्य उपविधी) 2009 मंजूर होवून दि. 01.04. 2009 पासुन लागु करण्यात आले. या उपविधीत पाणी पट्टयांच्या दराची वर्गवारी, मासिक पाणीवापराची मात्रा व त्याकरिता पाणीपट्टीचे दर इत्यादीत सुध्दा करण्यात आली.

पाणी पट्टीचे दर सन 2000 नंतर तब्बल 9 वर्षानी सुधारीत करण्यात आल्यामुळे ही दरवाढ सरासरी दुप्पट झाली. प्रदीर्घ कालावधीनंतर पाणीपट्टी दर सुधारीत केल्यावर जुने व नवीन दरात एकमुश्त येणारी वाढ व त्यामुळे नागरिकांवर येणारा आर्थिक बोझा व त्यामुळे नागरिकांत निर्माण होणारा असंतोष तसेच वेळोवेळी पाणीपट्टी दर सुधारीत न झाल्यामुळे नागपूर महानगरपालिकेच होणारे आर्थिक नुकसान इत्यादी बाबी लक्षात घेता पाणीपट्टीची दरवाढ दरवर्षी करता यावी या उद्देशाने महागाईत दरवर्षी सुमारे 6 ते 7 टक्के होणारी वाढ लक्षात घेता 2009 मध्ये सुधारीत करण्यात आलेल्या पाणीपट्टी उपविधित खालील प्रमाणे नविन उपविधी जोडण्यात आला व त्यास म.न.पा. व शासनाने मंजुरी प्रदान केली.

'' उपविधी 56(ब) – महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी आणि शासनाचे जलसंपदा विभागाने क्रमशः विद्युत व कच्चे पाणीपुरवठयाचे दरात केलेल्या वाढी व्यतिरिक्त इतर भाववाढीमुळे स्लम क्षेत्रात नळकनेक्शन व नियमितीकरणाचे कलम 6(क) मध्येनमूद दर, पाणीपट्टीचे दर कलम 9(अ), 9(क–1),9(क–2),9(ड–1),9(ड–2),9(इ),9(फ), दर कलम 10(ड) व 13 मध्ये नमूद पाणी वापर सुरक्षा अनामत रक्कम, दर कलम 29(अ)मध्ये नमूद अनधिकृत नळकनेक्शन नियमितीकरण शुल्क, दर कलम 29(ब) मध्ये नमूद नळतोडणी शुल्क व अनधिकृत पाणी वापर शुल्क, दर कलम 29 (क) मध्ये नमूद अनधिकृत नळकनेक्शन नियमितीकरण शुल्क/ नळतोडणी शुल्क व अनधिकृत पाणी वापर शुल्क आणि दर कलम 31(अ), 31(ब),31(क) मध्ये नमूद नळकनेक्शन पुनरजोडणी शुल्क इत्यादी दरांत व इतर शुल्कात आवश्यकतेप्रमाणे सुधारणा करता येईल व त्याचे अधिकार खालील प्रमाणे राहतील.

(1) एका वित्त वर्षात वर नमुद दर कलमांसह पाणीपट्टीच्या सर्व वर्गवारीमध्ये 5 टक्केपर्यंत दरवाढ करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना राहतील. मात्र स्थायी समितीकडे ही बाब माहितीकरिता पाठविणे अनिवार्य राहील.

(2) एका वित्तीय वर्षात 5 टक्के पेक्षा जास्त दरवाढ करण्याचे अधिकार महागनरपालिका सभेला राहतील.

सन 2009 च्या पाणीपट्टी दरवाढीनंतर पाणी देयकांमध्ये झालेल्या वाढीमुळे नागरीकांत असंतोष निर्माण झाला व त्यांनी या दरवाढीस विरोध दर्शविला. या विरोधाची दखल घेऊन म.न.पा. ने पाणीपट्टीचे दर कमी करण्याचा निर्णय घेऊन पाणी पट्टीचे दरात सुधारणा करण्याचा प्रस्तावासह अधिनियम 56 ब मध्ये सुध्दा सुधारणा प्रस्तावित केली. मात्र राज्य शासनाने म.न.पा. चे प्रस्तावात आपले स्तरावर सुधारणा करुन घेतलेला निर्णय 8 सप्टेंबर 2010 रोजी राजपत्रात प्रकाशीत करण्यास मान्यता प्रदान केली. मात्र म.न.पा.ने अधिनियम 56 ब मध्ये प्रस्तावित केलेली सुधारणा नामंजुर करुन 2009 मध्ये मंजूर करण्यात आलेल्या अधिनियमातील वर नमुद असलेले कलम 56 ब कायम ठेवले.

या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पाणीट्टी दरात सुधारणा, प्रत्येक वित्त वर्षात करावयाचे अधिकार मा. आयुक्तांना प्राप्त आहेत. त्यानुसार वित्त वर्ष 2011–12 व 2012–13 मध्ये मा. आयुक्तांनी त्यांना उपविधीने दिलेल्या अधिकारा अंतर्गत पाच टक्के दरवाढ लागू केली.

येथे नमूद करावयास हवे की, 01.04.2009 पासून शहरात घरगुती पाणी वापराकरीता लागू झालेले दर व देण्यात आलेली Subsidy खालील प्रमाणे आहे.

| बिलींग स्लॅब | दर रु.प्रति युनिट | प्रति युनिटवर देण्यात येणारी सबसिडी |
|---|---|---|
| 8 युनिटपर्यंत | 7 | 30 टक्के |
| 8 ते 20 युनिट | 8 | 20 टक्के |
| 21 ते 80 युनिट | 11 | प्रीमीयम |
| 80 युनिटचे वर | 15 | प्रीमीयम |

या दरांवर नागरिकांचे मोठया प्रमाणात आक्षेप घेऊन नागपूर महानगरपालिकेने दर कमी करण्याचा निर्णय घेतला व त्या अनुषंगाने दि. 01.01.2010 पासुन शहरात घरगुती पाणी वापराकरिता लागु झालेले दर व Subsidy खालील प्रमाणे होती.

| बिलींग स्लॅब | दर रु.प्रति युनिट | प्रति युनिटवर देण्यात येणारी सबसिडी |
|---|---|---|
| 1 ते 20 युनिटपर्यंत | 5 | 60 टक्के |
| 21 ते 30 युनिट | 8 | 34 टक्के |
| 31 ते 80 युनिट | 11 | प्रीमीयम |
| 80 युनिटचे वर | 15 | प्रीमीयम |

याचाच अर्थ असा की, म.न.पा.च्य पाणीपट्टी दर कमी करण्याच्या निर्णयामुळे घरगुती पाणीपट्टीच्या सबसिडीमध्ये वाढ झालेली आहे. तसचे अत्यावश्यक पाणीवापरापेक्षा जास्तीच्या पाणी वापराला सुध्दा सबसिडी उपलब्ध आहे.

शासनाने मंजुर केलेले नागपूर शहर पाणीपट्टी, दर मुल्यांकन वसुली उपविधीनुसार दरवर्षी 5 टक्के पर्यंत पाणी दरात वाढ करण्याची जे अधिकार मा. आयुक्तांना दिले आहेत त्यामध्ये फक्त CPI- Consumer price index (महागाई दर ) व WPI ( होलसेल प्राईज इंडेक्स ) मध्ये दरवर्षी होणारी वाढ अंर्तभूत आहे.

येथे नमूद करावयास हवे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे सन 2011–2012 करिता राज्यात लागु केलेले घरगुती पाण्याचे किमान दर रु. 11.20 प्रति युनिट आहेत व त्यानुसार नागपूर शहरालगतच्या गावातील सद्य पाणीपट्टी दरांचा खालील प्रमाणे आहे.

| महाराष्ट्र जीवन प्राधिकारण ाचे बिलींग स्लॅब | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे पाणीपुरवठा व्यवस्थापन असलेल्या भागातील दर प्रति युनिट | | | | | | नागपूर महानगर पालिका पाणीपट्टी ची बिलींग स्लॅब | नागपूर महानगर पालिकेचे प्रचलित दर | महाराष्ट्र जीवन प्राधिकारण व नागपूर महानगरपालिका यांचे पाणीपट्टी दरातील फरक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गोंदिया | यवतमाळ | अमरावती | वेणा | बल्लारपुर | रामटेक | | दर प्रति युनिट (प्रति 1000 लिटर) | दर प्रति युनिट (प्रति 1000 लिटर) | युनिट स्लॅब |
| 0 ते 10.5 युनीट | 11.2 | 11.2 | 11.2 | 11.2 | 11.2 | 11.2 | 0 ते 20 युनीट | 5.51 | 5.69 | 0 ते 10.5 युनीट |
| 10.5 ते 20 युनीट | 16.8 | 16.8 | 16.8 | 16.8 | 16.8 | 16.8 | 21ते 30 युनीट | 8.82 | 7.98 | 10.5 ते 20 युनीट |
| 20 ते 25 युनीट | 22.4 | 22.4 | 22.4 | 22.4 | 22.4 | 22.4 | 31ते 80 युनीट | 12.13 | 10.27 | 20 ते 25 युनीट |
| 25 युनीट चे वर | 28 | 28 | 28 | 28 | 28 | 28 | 80 युनीटचे वर | 16.54 | 11.46 | 26 ते 30 युनीट |

यावरुन स्पष्ट होते की, नागपूर शहराकरिता सध्या लागू झालेले दर Subsidised व राज्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लागु केलेल्या दराच्या तुलनेत फार कमी आहेत.

हस्ता/–कार्यकारी अभियंता
जलप्रदाय विभाग
मनपा,नागपूर

**<u>ठराव क्रमांक 171</u> :–** ग्रेट नाग रोड– नाग नदी वरील जुनी शुक्रवारी येथील जुन्या अरुंद पुलाचे सशक्तीकरण व रुंदीकरणासह बांधकामास्तव रु. 1,91,49,478/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 678 अंर्तगत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे, तसेच या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृतप्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार श्री.एस.एन.भोंबे ॲन्ड असोसिएटस् प्राय. लि. यांची म.न.पा.च्या मंजुर दरावर नेमणुक करण्याचा प्रचलित नियमानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 172</u> :–** प्रवर्तन विभाग तसेच क्षेत्रिय कार्यालय मार्फत अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करतांना जप्त करण्यात आलेले साहित्य सिताबर्डी किल्ला येथील गोडावून मध्ये तसचे झोन कार्यालयाच्या परिसरात ठेवण्यात आले असून मागील 1997 वर्षापासून या साहित्याची विल्हेवाट लावण्यात आलेली नाही.

या साहित्यामध्ये प्रमुखता टिनाचे पत्रे, लोखंडी सामान व इतर साहित्याचा समावेश आहे. सदुर्ह साहित्याची ई–निविदा आणि जाहिर लिलावाव्दारे विक्री करण्याकरीता व साहित्याची (Offset Price) निश्चित करण्याकरिता तांत्रिक अधिकारी तसेच स्थायी समितीच्या मान्यतेने पदाधिकाऱ्यांचा समावेश असणारी समिती गठीत करुन, सुचित संयुक्त समितीव्दारे निर्लेखन मुल्यासह निश्चित करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीवर ई–निविदा व जाहिर लिलावाची प्रक्रिया करणे उचित राहील.

वरील प्रमाणे जप्त साहित्याची ते साहित्य ज्या ठिकाणी व ज्या अवस्थेत आहे. त्या ठिकाणी आहे, त्या स्थितीत या साहित्याची पाहणी पदाधिकारी व तांत्रिक अधिकारी यांचे संयुक्त समितीव्दारे पहाणी करुन त्यांचे निर्लेखन मुल्य निश्चित करण्यात आल्यानंतर या साहित्याचा जाहीर लिलाव करण्यात मान्यता देण्याचा प्रस्ताव व या संयुक्त समितीमध्ये तांत्रिक अधिकारी म्हणून 1) श्री. गायकवाड,नगरयंत्री(प्रभारी) 2) श्री. होतवाणी, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) 3) श्री. तालेवार, कार्यकारी अभियंता (बांधकाम) (प्रभारी) 4) संबंधित झोनचे सहा. आयुक्त झोन क्र. 1 ते 10 5) श्री. जामगडे, नियंत्रण अधिकारी (प्रवर्तन विभाग) 6) श्री.निनावे, प्रवर्तन अधिक्षक असून त्यामध्ये घेण्यात येणाऱ्या पदाधिकाऱ्यांना समावेशा करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन खालील सदस्यांचा समावेश करुन विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. श्री. सतिश होले सदस्य
2. श्री. पूरुषोत्तम हजारे सदस्य
3. सौ. हर्षला जैस्वाल सदस्य

**<u>ठराव क्रमांक 173</u> :–** प्रभाग क्र.58,सावित्री फुले नगर मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 29,98,649/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 174</u> :— नागपूर शहरात येणारे हिवाळी अधिवेशना करीता वि.आय.पी. रोड वरील/ परिसरातील फुटपाथ,डिवायडर व चैनलाईझर ला ऑईल पेटींग करण्याकरिता मॅन्युफॅक्चर्स /अधिकृत विक्रेता/ नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून नियमित ई—निविदा बोलविण्याकरिता रु. 26,48,,000/— च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन हिवाळी अधिवेशनाचे अति महत्वाचे काम असल्यामुळे लघू निविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 175</u> :— प्रभाग क्र.40—ब,गांधीबाग कुंभारपुरा येथील राणी सतीकुंज बिल्डींग पासून चावला यांच्या घरापर्यंत कॉक्रिट पेव्हमेंट चे कामास्तव एकूण रु. 33,76,891/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 176</u> :— प्रभाग क्र. 4—ब, येथील देवीनगर व सन्याल नगर येथे सिमेन्ट कॉक्रिट रोड चे कामास्तव एकूण रु. 35,00,000/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. 682 अंतर्गत प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 177</u> :— नागपूर महानगरपालिका, नागपूर सिव्हील लाईन्स् येथील कार्यालयाच्या आवारात नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्राकलनास रुपये 17,99,45,258/—मंजुरी मा. स्थायी समिती ठराव क्र.135 दि.10.01.2003 अन्वये मिळाली आहे. यास मंजुर ठरावनुसार प्रकल्पाचे ''वास्तुशिल्पकार'' म्हणुन श्री.विरेंद्र खरे यांना म.न.पा.च्या विहित अटी व शर्तीवर पॅनलवर नियुक्त व 3टक्के सेवा शुल्क दरावर मंजुरी प्राप्त आहे. यामध्ये इमारत बांधकाम व संलग्न विद्युत कामे,अंतर्गत साज सजावट, जुन्या इमारतीचे नुतनीकरण, जुनी इमारत तोडणे, आतिल रस्त्यांचे बांधकाम, परिसरातील रस्त्यांचे बांधकाम, लॅण्डस्केपिंग व परिसर विकास या कामांचा वाव होता.

सदर नविन प्रशासकिय इमारतीच्या कामाचा वाव वाढवून रु.38,81,27,900 चे सुधारीत प्राकलनास मा. स्थायी समिती ठराव क्र. 209 दिनांक 28.02.2005 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. या करिता आर्किटेक्ट श्री. विरेंद्र खरे यांचेकडून मंजूर ठराव क्र.135 अन्वये 3 टक्के सेवा शुल्क दरावर सेवा घेण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे मा. आयुक्त, यांचे सुचनेप्रमाणे नविन प्रशासकिय इमारतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने Building management system, Air Cooling etc. नियोजन करण्यात आले. याकरिता मुख्यतः इलेक्ट्रिकल वर्क, फायर फायटनिंग सिस्टीम, BMS व यांचेशी निगडीत सिव्हील कामे यामध्ये वाढ होवून सुधारित प्राकलन रुपये 56,34,15,055.00 ला स्थायी समिती ठराव क्र. 674 दि.24.02.2009 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या कामाकरिता ठराव क्र. 135 दिनांक 10.01.2003 नुसार नियुक्त करण्यात आलेले आर्किटेक्ट श्री. विरेंद्र खरे यांचेकडुन तयार करण्यात आलेल्या रु.56,34,15,055.00 रकमेच्या सुधारीत प्राकलनावर सेवा घेणे सुरु आहे.

नविन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे मुळ प्राकलन रुपये 17,99,45,258.00 मध्ये वाढ होवून सुधारित प्राकलन रुपये 56,34,15,055.00 यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. या प्रकल्पातील बाबी वाढल्यामुळे व ही कामे वास्तुशिल्पकार यांच्या मुळ मंजुर प्राकलनात वाव नसल्याने या कामाचे मुळचे मंजुरीप्राप्त वास्तुशिल्पकार श्री. विरेंद्र खरे यांना वाढीव प्राकलन राशीस रु.56,34,15,055.00 वर मंजुरी प्रदान करण्याचा प्रस्ताव विभागातर्फे पाठविण्यात आला होता. सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती ठराव क्र.93 दिनांक 23.07.2012 अन्वये विभागास परत करण्यात आला होता. तरी वरील प्रस्ताव पुनःश्च विचारात घेणे.

त्याचप्रमाणे या प्रकल्पाचे वास्तुशिल्पकार श्री. विरेंद्र खरे यांना या आधीच मंजूर 3 टक्के सेवाशुल्क अदा करण्यासाठी व सेवा घेण्याचा प्रश्न विचारात घेवून मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नविन प्रशासकीय इमारतीचे जून 2013 पर्यंत संपूर्ण काम करुन घेण्याची जबाबदारी पी.एम.सी. ची राहील या अटीवर विषयांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 178</u> :– स्थायी समीती ठराव क्र. 86 दि. 27.07.2012 अन्वये संगणकाची प्लेन व प्रि–प्रिन्टेड स्टेशनरी, कन्झुमेबल्स व साहित्याचे नविन दर करार पुढील एक वर्षाच्या कालावधी करीता मंजूर करण्यास्तव संबंधीत निविदाधारक 1)मे.गुरुकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिन्टर्स, नागपूर 2) मे.गॅलेक्सी एन्टरप्रायजेस, नागपूर 3) मे.पी ॲन्ड जी सेल्स कारर्पोरेशन, नागपूर 4) मे. सुदर्शन पेपर कन्वरटींग वर्क्स, नागपूर यांचे सोबत वाटाघाटी केल्यानंतर प्राप्त निम्नतम दरा पेक्षा 2 टक्के दर कमी करुन जे दर मा.आयुक्तांनी एक वर्षाकरीता निश्चित केलेले आहेत. त्या दर कराराला व एक वर्षाच्या कालावधी ला येणारा अंदाजित खर्च रु. 90 लक्षाला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन रु. 90.00 लक्षा पर्यंत काम कार्यालयाने पूर्ण करावे या पेक्षा जास्त राशीचे काम करण्यास परत स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील या अटीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 179</u> :– नागपूर शहरातील खड्यांची दुरुस्ती जेटपॅचद्वारे (कोल्ड मिक्स व इमलशन चा वापर करुण) करण्याच्या कामाकरीता एकूण प्राप्त तिन निविदा पैकी मे. अंजनी लॉजिस्टीक्स यांनी सादर केलेली निम्नत्तम निविदा प्राकलनिय दरांपेक्षा 40.70% नी अधिक दराची प्राप्त झाली. वाटाघाटी नंतर प्राकलनिय दरापेक्षा 30.00% नी अधिक दराची रु. 2,35,67,440.00 राशीची निविदा स्विकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन ठराव क्र. 37, दि. 17.05.2012 अन्वये कार्यालयाद्वारे सादर केलेल्या प्रस्तावास स्थायी समितीने मंजूरी प्रदान करतेवेळी कार्यालयामार्फत प्रस्तावित करण्यांत आलेल्या Special condition's of contract मध्ये नमुद अट क्र. 10 मध्ये N.M.C. shall Provide minimum work at 5000 s.q.m. Per Months to the Contractor असे कार्यालयाद्वारे नमुद करण्यात आले होते. त्या प्रमाणे स्थायी समितीने विषयास मान्यता प्रदान केली. परंतू निविदेमध्ये अट क्र. 10 मुख्य अभियंता यांनी परस्पर बदल केल्याचे कार्याकारी अभियंता यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले.

स्थायी समितीने मंजूर केलेल्या ठरावातील अटी व शर्ती बदलविण्याचा अधिकार नियमाप्रमाणे मुख्य अभियंता यांना नाही.

करीता Special condition's of contract मधील नमुद अट क्र. 10 प्रमाणे 5000 s.q.m. कमीत कमी काम करण्यांत यावे ही अट करारनाम्यात अंतर्भूत करण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 180 :— नागपूर महानगरपालिकेतर्फे स्त्रीभ्रुण हत्यावर प्रतिबंध घालण्यासाठी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाकरीता "लाडली लक्ष्मी योजना" लागु करण्यात आली आहे. ही योजना पुढील प्रमाणे राबविण्याकरीता प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

१) मुलीचा जन्म झाल्यानंतर १ वर्षाच्या आतील मुलीचा विमा काढण्यात येईल.
२) मुलीचा मृत्यु ७ वर्षाआधी झाल्यास वारसदारास भरलेला हप्ता परत मिळेल.
३) मुलीचा मृत्यु ७ वर्षानंतर झाल्यास वारसदाराला रु. ५०,०००/— अधिक बोनस मिळेल.
४) मुलीच्या वयाच्या २१ व्या वर्षी पॉलिसी परिपक्व झाल्यानंतर पूर्ण राशी रुपये १,२४,५००/— इतकी रक्कम मुलीला मिळेल.
५) या योजनेकरीता मुलीचा वयाचा दाखला, वडीलांच्या वयाचा दाखला, वडीलांचे ओळखपत्र, रहिवाशी दाखला व वडीलांचा १ पासपोर्ट फोटो इत्यादी दस्तऐवजाची आवश्यकता राहील. त्याचप्रमाणे ज्या पालकांना दोन पेक्षा जास्त अपत्य आहेत. त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. जन्माला येणारे अपत्य पहिली किंवा दुसरी मुलगी असणे आवश्यक आहे.
६) योजनेकरीता विम्याचा वार्षिक हप्ता (दरवर्षी भरावा लागणारा)रुपये २,२५८/— राहील. ही रक्कम महानगरपालिके तर्फे भरण्यात येईल.

या योजनेवरील खर्च भागविण्याकरीता महानगरपालिकेचे सन२०१२—२०१३ चे अर्थसंकल्पामध्ये रु. १००.०० लक्ष इतकी तरतूद पद क्रमांक ६४६ मध्ये करण्यात आली आहे. त्यामधुन योजनेचा खर्च करण्यात येईल. सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

ठराव क्रमांक 181 :— नागपूर महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लान्ट विभागाकरिता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरीता एकूण प्राप्त नऊ निविदा पैकी मे. मुकेश कन्सट्रक्शन यांनी सादर केलेली निम्नत्तम निविदा प्राकलनिय दरांपेक्षा 37.86% नी कमी दराची रु. 62,13,758.00 राशीची निम्नत्तम निविदा स्विकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 182 :— प्रभाग क्र. 50—अ मधील 79 ग्रेट नाग रोड ते नाग नदी (धोबीघाट नाला) चे बांधकाम करण्याबाबतच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 45,83,680/— च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 183 :— वॉर्ड क्र. 88, धंतोली येथे गॅस गोडावून ते डॉ. पोफळी आणि डॉ. संगतानी ते डॉ. मुकेश मिश्रा पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त 9 नविदापैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दरांपेक्षा 19. 98 प्रतिशत ने कमी दरांची रु. 35,29,618/— रकमेची निम्नतम निविदा मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

<u>ठराव क्रमांक 184</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर